RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक १५] शुक्रवार, ऑगस्ट १६, २०२४/श्रावण २५, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ .—** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | १-३ |

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ ऑगस्ट २०२४.

**MAHARASHTRA ORDINANCE No. V OF 2024.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; १९६५ चा महा. ४०.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-१ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३४१ब-१ मधील पोट-कलम (९) वगळण्यात येईल आणि ते १ जानेवारी २०२२ रोजीपासून वगळण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. १९६५ चा महा. ४०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-२ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-२ मध्ये, पोट-कलम (६) मधील "अडीच वर्षांच्या मुदतीसाठी" या मजकुराऐवजी "पाच वर्षांच्या मुदतीसाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो १ जानेवारी २०२२ रोजीपासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-४ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल आणि ते १ जानेवारी २०२२ रोजीपासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

"(१) अध्यक्षाचा पदावधी पाच वर्षे इतका असेल आणि त्याची मुदत नगर पंचायतीच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.";

(दोन) पोट-कलम (३) वगळण्यात येईल आणि ते १ जानेवारी २०२२ रोजीपासून वगळण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५.** (१) या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, परंतु या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निदेश, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, देता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला कोणताही आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४० ) यामध्ये अंतर्भूत असलेल्या नगर पंचायतीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीसंबंधीच्या तरतुदींमध्ये, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधून नगर पंचायतीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करण्यासाठी आणि अशा पदाधिकाऱ्यांचा पदावधी अडीच वर्षे इतका करण्यासाठी तरतूद करण्याच्या दृष्टीने, सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेली आहे. सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या प्रारंभानंतर नगर पंचायतींसाठी घ्यावयाच्या निवडणुकांच्या बाबतीत, अध्यक्षाची थेट निवडणूक करण्यासाठी आणि अध्यक्षाचा व उपाध्यक्षाचा पदावधी पाच वर्षे इतका करण्याच्या दृष्टीने उक्त अधिनियमात सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ द्वारे त्यानंतर सुधारणा करण्यात आली आहे.

२. अप्रत्यक्षपणे निवडलेल्या नगर पंचायतींच्या अध्यक्षाचा व उपाध्यक्षाचा पदावधीदेखील पाच वर्षे इतका असेल अशी तरतूद करणे आवश्यक आहे असे शासनास वाटते. म्हणून, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ३४१ब-१, ३४१ब-२ व ३४१ब-४ यामध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित केला आहे.

मुंबई,
दिनांक १५ ऑगस्ट २०२४.

**सी. पी. राधाकृष्णन,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. के. एच. गोविंद राज,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.